


| वर्ष - 9 | अंक -41 | UDYAM-MH-26-0158827 |

# महाईन्यूज ™

महात्मा गांधी व
लालबहादुर शास्त्री
जयंतीनिमित्त अभिवादन



www.mahaenews.com | ।गुरुवार, दि. 2 ऑक्टोबर 2025 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | mahaenews.com | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!


## अमेरिका-भारत व्यापार तणावात मोठी वाढ

## ७ देश थेट लावणार भारतावर टॅरिफ

# जग हादरलं!

## ट्रम्पचा मोठा डाव, अर्थव्यवस्थेला मोठा धक्का भारतावर ५०% टॅरिफ, आता बंदर करारही रद्द



।पुणे ।प्रतिनिधी। महाईन्यूज

**व्यापारविश्वात एकाच झटक्यात खळबळ माजवणारी घटना घडली आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी भारतावर थेट ५० टक्क्यांचा प्रचंड टॅरिफ लादला असून त्यामध्ये आता जी-७ देश देखील उतरले आहेत. जगातील सर्वात प्रभावशाली देशांनी भारताला वेढा घालण्याची तयारी सुरू केली आहे.अर्थव्यवस्थेवर आधीच मंदीचे ढग आहेत, त्यात या टॅरिफमुळे भारताला मोठा फटका बसणार आहे. "भारत रशियाकडून तेल खरेदी करत आहे" हा मुख्य मुद्दा पुढे करत ट्रम्प यांनी जागतिक मंचावर भारताविरोधात मोहीम छेडली आहे.**

आजच्या घडीला जगभरातील सर्वात मोठा भू-राजकीय आणि आर्थिक संघर्ष म्हणजे ऊर्जा व्यापार आहे. अमेरिका आणि जी-७ देशांना रशियाला कमकुवत करायचे आहे, पण भारतासारखे देश रशियन तेल खरेदी करून आपला आर्थिक फायदा पाहत आहेत.

या संघर्षात भारत केंद्रस्थानी आला आहे. ट्रम्प यांचा टॅरिफ डाव किती दिवस टिकतो, जी-७ देशांची कारवाई किती कठोर होते आणि भारत कशी मुत्सद्दी भूमिका घेतो, यावर येणाऱ्या काही महिन्यांत भारतीय अर्थव्यवस्थेचे भविष्य ठरणार आहे.

### अमेरिका-भारत व्यापार तणाव वाढतोय

काही दिवसांपूर्वीच अमेरिकेने भारतावर तब्बल ५० टक्के टॅरिफ लावला. एवढेच नव्हे, तर भारतासाठी महत्त्वाचा असलेला बंदर करारही रद्द करण्यात आला. यासोबतच अमेरिकेने H-1B व्हिसाच्या नियमात बदल केले आहेत. याचा थेट परिणाम भारतीय आयटी क्षेत्रावर होणार असून, लाखो रोजगार धोक्यात येऊ शकतात.

अमेरिकेचा स्पष्ट दबाव आहे की भारताने कोणत्याही परिस्थितीत रशियाकडून तेल खरेदी थांबवावे. पण भारताने आपली भूमिका ठाम ठेवली आहे – "रशियन तेल खरेदी आपला राष्ट्रीय निर्णय आहे."

### जी-७ देश आता खेळात

डोनाल्ड ट्रम्प यांनी आता या वादामध्ये इतर देशांना खेचलं आहे. कॅनडा, फ्रान्स, जर्मनी, जपान, इटली आणि ब्रिटन हे देश – एकूण जी-७ राष्ट्रे – भारताविरोधात आक्रमक होण्याच्या तयारीत आहेत.

या आठवड्यात झालेल्या बैठकीत जी-७ देशांनी स्पष्ट शब्दांत म्हटलं –

"आम्ही आता त्यांना टार्गेट करणार आहोत जे रशियाकडून तेल खरेदी करून युक्रेनवरील अतिक्रमणाला अप्रत्यक्ष पाठबळ देत आहेत."

यामुळे भारताच्या अडचणी अधिकच वाढण्याची शक्यता आहे. आयात-निर्यात रोखणे, व्यापार निर्बंध, टॅरिफ वाढवणे अशा उपाययोजनांवर चर्चा झाली आहे.

### डोनाल्ड ट्रम्पचा "टॅरिफ प्रेम"

ट्रम्प यांनी माध्यमांशी बोलताना एक वाक्य विशेष गाजलं –

"माझ्या आवडता शब्द म्हणजे टॅरिफ."

त्यांच्या मते टॅरिफमुळे अमेरिकेत पैसा ओघाने येतो आणि देश लवकर श्रीमंत होतो. पण या धोरणाचा थेट फटका भारतासारख्या उभरत्या अर्थव्यवस्थांना बसतो आहे.\

### चीनवर सवलत, भारतावर कठोरता

यातील सर्वात मोठा प्रश्न असा आहे की चीन हा रशियाकडून भारतापेक्षा जास्त तेल खरेदी करतो, तरीही ट्रम्प प्रशासनाने चीनवर कोणताही टॅरिफ लादलेला नाही. उलट, ट्रम्प यांनी जाहीर केले आहे की पुढील चार आठवड्यांत ते चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्याशी थेट भेट घेणार आहेत.

या बैठकीत सोयाबीन व्यापार हा मुख्य मुद्दा असेल. चीनने अमेरिकेचे सोयाबीन खरेदी बंद केल्याने अमेरिकन शेतकऱ्यांना प्रचंड फटका बसला आहे. म्हणूनच ट्रम्प यांचे लक्ष सध्या चीनसोबत सौदा करून शेतकऱ्यांचा विश्वास जिंकण्यावर ओ. त्यामुळे भारतावर कठोर भूमिका घेत असताना चीनवर सौम्य धोरण अवलंबले जात असल्याचे स्पष्ट दिसते.

### भारतीय अर्थव्यवस्थेवर परिणाम

टॅरिफ वाढल्याने निर्यात घटणार – भारतीय कंपन्यांचे अमेरिकेला जाणारे निर्यात माल महाग होईल.

आयटी क्षेत्राला फटका – H-1B व्हिसा बदलामुळे लाखो भारतीय आयटी व्यावसायिकांच्या संधी कमी होतील.

तेल आयात संकट – रशियाकडून स्वस्तात तेल खरेदी करण्याची भारताची संधी धोक्यात येईल.

रुपयाचा अवमूल्यनाचा धोका – व्यापार तूट वाढल्यास रुपयावर दबाव येईल.

**गुंतवणूक घट** – विदेशी गुंतवणूकदारांना धोका वाटल्यास गुंतवणूक कमी होऊ शकते.

भारताने स्पष्ट भूमिका घ्यावी लागणार आहे की तो अमेरिकेचा दबाव मान्य करतो का. जी-७ देशांनी जर खरोखर कठोर कारवाई केली तर भारताची जागतिक व्यापार साखळी मोठ्या संकटात सापडू शकते. भारताने एकीकडे रशियाशी संबंध टिकवायचे आहेत, तर दुसरीकडे अमेरिका-युरोपियन देशांशी व्यापाराचे दार बंद होऊ नये याची काळजी घ्यावी लागणार आहे.



## डोनाल्ड ट्रम्प घेणार शी जिनपिंग यांची भेट

अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी सर्वांना मोठा धक्का देत म्हटले की, माझ्या आवडतीचा शब्द आता टॅरिफ असून हा शब्द मला खूप जास्त आवडत आहे. याचे कारण म्हणजे आपण लवकर श्रीमंत होऊ शकतो. आपल्याकडे जितका पैसा यापूर्वी कधीच आला नव्हता, तेवढा पैसा येतोय. काही लोक अमेरिकेचा फायदा करून घेत होते आणि बदल्यामध्ये काही देत नव्हते. आता त्यांच्यावर योग्य नियम लावलाय. अमेरिकेने भारतावर अत्यंत मोठा टॅरिफ लावला. हा टॅरिफ लावण्याकरिता त्यांनी कारण दिले की, भारत हा रशियाकडून तेल खरेदी करत असल्याने आपण टॅरिफ लावत आहोत. मात्र, भारतापेक्षाही जास्त तेल चीन हा रशियाकडून खरेदी करतो. मात्र, त्या चीनवर कोणताही टॅरिफ अमेरिकेने लावला नाही. मागील काही दिवसांपासून टॅरिफच्या मुद्द्यामध्ये चीन-अमेरिका यांच्यातील संबंध तणावात आहेत. मात्र, आता डोनाल्ड ट्रम्प यांनी अत्यंत मोठा डाव टाकत थेट म्हटले की, चार आठवड्यांत चीनचे राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांच्यासोबत ते भेट घेणार आहेत.

## आघाडीची माहिती तंत्रज्ञान कंपनी

## कर्मचाऱ्यांना राजीनामा द्यायला भाग पाडल्याचा आरोप

# पुण्यात टीसीएसकडून मोठी कपात

## मुख्यमंत्री फडणवीसांकडे तक्रार

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**भारतातील आघाडीची माहिती तंत्रज्ञान कंपनी असलेल्या टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस अर्थात टीसीएसने पुण्यातील सुमारे २,५०० कर्मचाऱ्यांना नोकरीवरून राजीनामा देण्यास भाग पाडल्याचा आरोप आयटी कर्मचाऱ्यांच्या संघटनेने बुधवारी महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्रात केला आहे.**




कंपनीतील कर्मचारी कौशल्यांचे पुनर्गठन करण्याच्या उपक्रमामुळे मर्यादित संख्येने कर्मचाऱ्यांवरच परिणाम झाला असल्याचे मात्र टीसीएसने म्हटले आहे. नॅसेंट इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी एम्प्लॉईज सिनेटचे (नाइट्स) अध्यक्ष हरप्रीत सिंग सलुजा यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात बाधित कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी वेळेवर हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. एनआयटीएसच्या प्रतिनिधित्वाच्या आधारे, केंद्रीय कामगार मंत्रालयाने महाराष्ट्र कामगार सचिवांना या प्रकरणात आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत असे सलुजा म्हणाले. एकट्या पुण्यात, अलिकडच्या आठवड्यात सुमारे २,५०० कर्मचाऱ्यांना राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले आहे किंवा अचानक काढून टाकण्यात आले आहे, एनआयटीएसने म्हटले आहे.मात्र टीसीएसने ही माहिती चुकीची आणि हेतुपुरस्सर खोडसाळपणा असल्याचे सांगितले. कर्मचारी कौशल्यांचे पुनर्गठन करण्याच्या प्रयत्नांचा भाग असल्याचे टीसीएसने सांगितले. कंपनीने जूनमध्ये या वर्षी जागतिक कर्मचाऱ्यांपैकी सुमारे २ टक्के म्हणजेच सुमारे १२,२६१ कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याची घोषणा केली, ज्यामध्ये बाधित झालेले बहुतेक कर्मचारी मध्यम आणि वरिष्ठ श्रेणीतील आहेत.बाधित झालेल्यांपैकी बरेच जण मध्यम ते वरिष्ठ पातळीचे व्यावसायिक आहेत, ज्यांनी कंपनीला १०-२० वर्षे समर्पित सेवा दिली आहे. त्यापैकी बरेच कर्मचारी ४० वर्षांपेक्षा जास्त वयाचे आहेत, ज्यांच्यावर ईएमआय, शाळेची फी, वैद्यकीय खर्च आणि वृद्ध पालकांबद्दलच्या जबाबदाऱ्यांचा भार आहे. त्यांच्यासाठी, आजच्या स्पर्धात्मक बाजारपेठेत पर्यायी नोकरी शोधणे जवळजवळ अशक्य आहे, असे एनआयटीईएसने म्हटले आहे.

बाधित कर्मचाऱ्यांच्या मुलांचे शिक्षण धोक्यात आहे, कर्ज फेडले जाऊ शकते आणि कुटुंबांना भावनिक आघात आणि आर्थिक संकटाचा सामना करावा लागू शकतो, असे त्यात म्हटले आहे. कर्मचारी कपात औद्योगिक वाद कायदा, १९४७ चे उघड उल्लंघन करून केली जात आहेत, असा दावा केला आहे. आयटी कर्मचारी संघटनेने आरोप केला आहे की, टीसीएसने कर्मचाऱ्यांना कोणताही वैधानिक छाटणी भरपाई दिलेली नाही आणि भीती आणि दबावाखाली कर्मचाऱ्यांना स्वेच्छेने राजीनामे देण्यास भाग पाडले आहे.कंपनीतील कर्मचारी कौशल्यांचे पुनर्गठन करण्याच्या उपक्रमामुळे मर्यादित संख्येने कर्मचाऱ्यांवरच परिणाम झाला असल्याचे मात्र टीसीएसने म्हटले आहे. नॅसेंट इन्फॉर्मेशन टेक्नॉलॉजी एम्प्लॉईज सिनेटचे (नाइट्स) अध्यक्ष हरप्रीत सिंग सलुजा यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लिहिलेल्या पत्रात बाधित कर्मचाऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी वेळेवर हस्तक्षेप करण्याची मागणी केली आहे. एनआयटीएसच्या प्रतिनिधित्वाच्या आधारे, केंद्रीय कामगार मंत्रालयाने महाराष्ट्र कामगार सचिवांना या प्रकरणात आवश्यक कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत असे सलुजा म्हणाले. एकट्या पुण्यात, अलिकडच्या आठवड्यात सुमारे २,५०० कर्मचाऱ्यांना राजीनामा देण्यास भाग पाडण्यात आले आहे किंवा अचानक काढून टाकण्यात आले आहे, एनआयटीएसने म्हटले आहे.

### २,५०० कर्मचाऱ्यांचा राजीनामा

मात्र टीसीएसने ही माहिती चुकीची आणि हेतुपुरस्सर खोडसाळपणा असल्याचे सांगितले. कर्मचारी कौशल्यांचे पुनर्गठन करण्याच्या प्रयत्नांचा भाग असल्याचे टीसीएसने सांगितले. कंपनीने जूनमध्ये या वर्षी जागतिक कर्मचाऱ्यांपैकी सुमारे २ टक्के म्हणजेच सुमारे १२,२६१ कर्मचाऱ्यांना काढून टाकण्याची घोषणा केली, ज्यामध्ये बाधित झालेले बहुतेक कर्मचारी मध्यम आणि वरिष्ठ श्रेणीतील आहेत.बाधित झालेल्यांपैकी बरेच जण मध्यम ते वरिष्ठ पातळीचे व्यावसायिक आहेत.

# दसऱ्यासाठी श्रीक्षेत्र जेजुरीत जय्यत तयारी

## दसरा सोहळ्यासाठी हजारो भाविक डोंगरात उपस्थित

।मुंबई।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**श्रीक्षेत्र जेजुरी येथील मर्दानी दसरा प्रसिद्ध असून, या सोहळ्यासाठी श्री मार्तंड देवस्थानने जय्यत तयारी केली आहे. खंडोबा गडाला आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने गड परिसर उजळला आहे. मर्दानी दसऱ्यासाठी येत्या गुरुवारी सायंकाळी सहा वाजता पालखी सोहळा खंडोबा गडातून सिमोलंघनासाठी कडेपठार दरीतील रमणा या ठिकाणी जाणार आहे.**



कडेपठारची पालखी आणि खंडोबाची पालखी यांची मध्यरात्री अडीच वाजता भेट होणार आहे. या दसरा सोहळ्यासाठी हजारो भाविक डोंगरात उपस्थित असतात. दुसऱ्या दिवशी सकाळी खंडोबा गडामध्ये असणारा ऐतिहासिक खंडा (तलवार) उचलण्याची स्पर्धा होणार आहे. या स्पर्धेसाठी गेले महिनाभर अनेक तरुण एका हातात तलवार जास्त वेळ उचलण्याची आणि तलवारीच्या कसरती करण्याची तयारी करीत आहेत.

दरम्यान, नवरात्रात खंडोबा गडामध्ये दररोज विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले.

श्रीक्षेत्र जेजुरी येथील मर्दानी दसरा प्रसिद्ध असून, या सोहळ्यासाठी श्री मार्तंड देवस्थानने जय्यत तयारी केली आहे. खंडोबा गडाला आकर्षक विद्युत रोषणाई केल्याने गड परिसर उजळला आहे. मर्दानी दसऱ्यासाठी येत्या गुरुवारी सायंकाळी सहा वाजता पालखी सोहळा खंडोबा गडातून सिमोलंघनासाठी कडेपठार दरीतील रमणा या ठिकाणी जाणार आहे. कडेपठारची पालखी आणि खंडोबाची पालखी यांची मध्यरात्री अडीच वाजता भेट होणार आहे. दुसऱ्या दिवशी सकाळी खंडोबा गडामध्ये असणारा ऐतिहासिक खंडा (तलवार) उचलण्याची स्पर्धा होणार आहे.

### देवस्थानने जय्यत तयारी केली

अनेक तरुण एका हातात तलवार जास्त वेळ उचलण्याची आणि तलवारीच्या कसरती करण्याची तयारी करीत आहेत. दरम्यान, नवरात्रात खंडोबा गडामध्ये दररोज विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रम घेण्यात आले. नवरात्रात खंडोबा गडामध्ये दररोज विविध धार्मिक सामाजिक कार्यक्रम घेण्यात आलेया सोहळ्यासाठी श्री मार्तंड देवस्थानने जय्यत तयारी केली आहे.

## सार्वजनिक वाहतुकीचे सक्षमीकरण बीआरटी मार्गांमध्ये घुसखोरी केल्यास

# वाहन परवाना रद्द होणार!

### महापालिका व वाहतूक पोलिस करणार कारवाई

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी-चिंचवड सायन्स पार्क आणि प्लॅनेटेरियमच्या पुढाकाराने नागरी शाळेतील विद्यार्थ्यांसाठी महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या हस्ते करण्यात आले. या केंद्रात कोडिंग, रोबोटिक्स, कृत्रिम बुद्धिमत्ता आणि जागतिक दर्जाच्या तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण दिले जाणार असून अॅडव्हान्स कॉम्प्युटर लॅबही विद्यार्थ्यांसाठी खुली करण्यात आली आहे.**



शहरातील सार्वजनिक वाहतुकीचे सक्षमीकरण करण्यासाठी बीआरटी मार्ग सुरु केले आहे. मात्र वाहतूक कोंडी होवू लागल्याने बीआरटी मार्गातून खासगी वाहनांची घुसखोरी होत आहे. यावर उपाय म्हणून दंडात्मक कारवाई होवू लागली आहे. तरीही बीआरटी मार्गातील खाजगी वाहनांची घुसखोरी कमी होत नसल्याने आता वाहन परवाना रद्द करण्यात येणार आहे. ही कारवाई महापालिका आणि वाहतूक पोलिसाकडून करण्यात येणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहरात महापालिकेने सांगवी ते किवळे, नाशिक फाटा ते वाकड, निगडी ते दापोडी, काळेवाडी फाटा ते देहू – आळंदी, बोपखेल ते आळंदी, भक्ती-शक्ती ते मुकाई चौक असे बीआरटी मार्ग तयार केले आहेत. केंद्राच्या जेएनएनयूआरएम योजनेअंतर्गत रस्त्यावर बीआरटी मार्ग तयार केले. तर उर्वरित रस्त्यावर इतर नियमित रहदारासाठी, सायकल ट्रॅक, फुटपाथ बांधण्यात आले आहेत. बीआरटी रस्त्यावर सतत मेट्रो, भूयारी मार्ग, उड्डाणपुल अशी वेगवेगळी कामे करण्यात येत असल्याने अनेकदा बीआरटी मार्ग बंद ठेवण्यात येत आहे. अन्य बीआरटी लेन सोडून इतर रस्त्यावर प्रचंड वाहतूक कोंडी होत असून

> “बीआरटी मार्गातून खासगी वाहनांनी ये-जा केल्यास संबंधित वाहन चालकांचा परवाना आरटीओकडून रद्द करण्यात येणार आहे; मात्र शहरातील बीआरटी मार्गातून रुग्णवाहिका, पोलिसांची वाहने, तसेच आग्निशमन वाहनांना प्रवेश आहे.
>
> **–बापूसाहेब गायकवाड,** सहशहर अभियंता
> पिंपरी चिंचवड महापालिका

बीआरटी मार्ग ओस पडत आहेत. बीआरटी मार्गावर बससाठी स्वतंत्र सिग्नल व्यवस्था, पादचाऱ्यांसाठी रस्ता ओलांडण्यासाठी व्यवस्था, बीआरटी बस थांबा अशी अनेक कामे करण्यात आली. पण, रस्ता ओलांडणे, हे पादचाऱ्यांसाठी नेहमीच धोकादायक ठरत आहे. रस्त्यावर एवढी गर्दी असते, त्यामुळे नागरिकांना व्यवस्थित रस्ता ओलांडणे अवघड झाले आहे. अनेक बीआरटी मार्ग रिकामे राहत आहे. तर शेजारच्या रस्त्यावर वाहनांची प्रचंड गर्दी असे चित्र दिसत आहे.

शहरातील बस रॅपिड ट्रान्झिट (बीआरटी) मार्गातील वाढती खासगी वाहनांची घुसखोरी रोखण्यासाठी वाहनांवर दंडात्मक कारवाईचा निर्णय महापालिकेकडून घेण्यात आला आहे. परंतु तरी देखील घुसखोरीचे प्रमाण कमी न झाल्याने पालिका प्रशासनाकडून बीआरटी मार्गातील थांब्यांवर सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. या सीसीटीव्ही कॅमेरा द्वारे खाजगी वाहनांची बीआरटी मार्गात घुसखोरी करणाऱ्यांचा वाहन परवाना रद्द करण्यात येणार आहे.

### अपघातांच्या घटनांमुळे निर्णय

शहरवासियांना जलद आणि सुरक्षित प्रवास करण्यासाठी पुणे व पिंपरी चिंचवड महापालिकांकडून खर्च करुन पीएमपीएल बससाठी स्वतंत्र बीआरटी मार्गिका उभारण्यात आली आहे. शहरात 52 किलोमीटर अंतराची बीआरटी मार्गिका आहे. त्यामध्ये एकून पाच बीआरटी मार्गावर 52 थांबे आहेत. शहरातील बीआरटीच्या पाच मार्गाचा समावेश आहे. या मार्गातून खासगी वाहन चालक बिनधास्तपणे गाड्या नेतात. त्यामुळे अपघाताच्या घटना सतत घडत आहेत.

### आरटीओ कारवाई करणार

बीआरटी मार्गातील अशा घुसखोरांवर वाहतूक पोलिसांच्या वतीने कारवाई करुन देखील कोणत्याही प्रकारची सुधारणा होत नसल्याचे चित्र शहरात दिसत आहे. त्यामुळे आता ही घुसखोरी थांबवण्यासाठी बीआरटी बसथांब्यांवर सीसीटीव्ही बसविण्यात आले आहेत. याद्वारे बीआरटीतील घुसखोर वाहन चालकांवर वाहतूक पोलिसांकडून कारवाई करण्यात येईल. तसेच आरटीओकडून वाहन परवाना रद्द केला जाणार आहे. ही कारवाई बीआरटी विभाग तसेच आरटीओ मार्फत केली जाणार आहे.

### शहरातील बीआरटी मार्ग

बीआरटी मार्ग -5
बीआरटी थांबे – 52
एकूण सीसीटीव्ही – 92

## महिला बचतगटांसाठी देशातील पहिला ई-लिलाव

### पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा अभिनव उपक्रम

।पिंपरी चिंचवड।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या समाज विकास विभागामार्फत महिला व बालकल्याण योजना अंतर्गत मौजे आकुर्डी येथील खाद्यपदार्थ केंद्रातील गाळे महिला बचत गटांना भाडेकराराने देण्यासाठी ई-लिलावाचे आयोजन करण्यात आले होते. लिलावात ९७ महिला बचत गटांनी सहभाग नोंदवला**



आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह व अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मे. रिलायन्स ऑकशन चे प्रतिनिधी इब्राहीम खान यांच्या सहकार्याने एकूण ४९ गाळे ई-लिलावासाठी उपलब्ध करून देण्यात आले. त्यात दिव्यांग महिला बचत गटांसाठी २, तृतीयपंथी गटासाठी १, कोविड योद्धा महिला बचत गटासाठी १, आदिवासी महिला बचत गटासाठी २, DAY-NULM अंतर्गत ३, तर पीसीएमसी सक्षमा अंतर्गत नोंदणीकृत महिला बचत गटांसाठी तब्बल ४० गाळ्यांचे आरक्षण करण्यात आले.

या ई-लिलावात १५,१०० रुपये ते ३२,००० रुपये या दरम्यान बोली लावली गेली. विशेष म्हणजे, महिला बचत गटांना गाळे वाटप करण्यासाठी आयोजित केलेला हा देशातील पहिलाच ई-लिलाव ठरला आहे.

> पिंपरी चिंचवड महानगरपालिका समाज विकास विभागामार्फत महिलांना उपजीविका निर्मितीची संधी उपलब्ध करून देण्यासाठी आकुर्डी फूड कोर्टाद्वारे आपण ही सुरूवात केली आहे. या माध्यमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनवणे, त्यांना स्वतःचा व्यवसाय उभा करण्याची संधी देणे आणि समाजातील दुर्बल घटकांना मुख्य प्रवाहात आणणे हा आमचा उद्देश आहे. गाळ्यांचे वाटप पारदर्शक पद्धतीने ई-लिलावाद्वारे करण्यात आल्यामुळे प्रत्येक गटाला समान संधी मिळाली आहे. या उपक्रमामुळे महिला बचत गटांच्या कार्याला प्रोत्साहन मिळून त्यांची आत्मनिर्भरता वाढेल आणि पिंपरी चिंचवडमध्ये उद्योजक महिलांची नवी पिढी घडेल.
>
> **—ममता शिंदे,** उप आयुक्त, समाज विकास विभाग, पिंपरी चिंचवड

गाळे प्रथम तीन वर्षांसाठी भाड्याने देण्यात येणार असून कामकाज समाधानकारक असल्यास पुढील दोन वर्षांची मुदतवाढ मिळेल.

# देशांतर्गत वसाहतीकरणाचा 'आराखडा'!



## भूमिका

**राज्य अभ्यासक्रम आराखड्या'चा अंतिम मसुदा हा केंद्र (मध्यवर्ती) सरकारच्या आराखड्याप्रमाणे गोंधळलेला तर आहेच; पण 'बालभारती'ची पुस्तकं नववीपासून नकोच, अभ्यासक्रमही दिल्लीच्या पाठ्यपुस्तकांतलेच हवे, अशा शिफारशी करणारा हा आराखडा राज्याच्या शैक्षणिक प्रगतीची गळचेपी करणारा ठरेल, म्हणून तो रद्द करावा...**

'मनुस्मृती'च्या अनावश्यक उल्लेखानं वादग्रस्त ठरलेल्या शालेय शिक्षणाच्या 'राज्य अभ्यासक्रम आराखड्या'चा (राअआ) अंतिम मसुदा निवडणुका जाहीर होण्याआधी घाईघाईने प्रसिद्ध झाला. अभ्यासक्रम आराखडे तयार करणे म्हणजे बोजड शब्दांतील अवजड (व बरेचदा निरर्थक) दस्तऐवज उत्पादनाचा कारखाना असल्याची भावना राज्याचं 'विद्या प्राधिकरण' (एससीईआरटी) निर्माण करतंय. शालेय शिक्षणासाठी ४१४ पृष्ठे तर बालशिक्षणासाठी तब्बल ५९९ पृष्ठे खर्ची घालणारे आराखडे, हे याचे काही नमुने. यासाठीची मूळ प्रेरणा व धाक मध्यवर्ती (केंद्र) सरकारचे आहेत हे निर्विवाद! मात्र राज्यपातळीवर शिक्षणासाठी घटनात्मकदृष्ट्या जबाबदार शिखर संस्थेकडून निर्विचार (विनाविचार) कामाचा पायंडा पडणं, संघराज्यीय लोकशाहीसाठी चिंताजनक आहे. पाच भागांमध्ये निर्मित 'राअआ'



इयत्ता तिसरी ते बारावीच्या शिक्षणासंबंधी शिफारशी करतो. मात्र हा 'अभ्यासक्रम आराखडा' आहे, की 'पाठ्यक्रम दस्तऐवज' की 'शासन परिपत्रकाचा संच', असा प्रश्न पडतो. आराखड्यांनुसार यात मार्गदर्शक तत्त्वं आणि इयत्तावार विषयरचना सुचवलीय, पाठ्यक्रम असल्यासारखी इयत्तावार क्षमताविधानं आणि अध्ययन अनुभवांची जंत्री आहे. केंद्रीकरणाचा सोस दाखवणाऱ्या परिपत्रकांप्रमाणे संबंध राज्यासाठी इयत्तावार, तासिकावार साप्ताहिक वेळापत्रकं आहेत. अशा साऱ्या गदारोळांमुळं 'अरे भाई कहना क्या चाहते हो?' ही भावना बळावत जाते. मध्यवर्ती सरकारच्या आराखड्याने प्रेरित (की भारित?) 'राअआ' म्हणजे अनेक ठिकाणी निव्वळ (सदोष) भाषांतराचा नमुना आहे. उदाहरणार्थ, डिजिटल स्रोतांची यादी देताना 'एनसीईआरटीने सर्व पाठ्यपुस्तके ऑनलाइन उपलब्ध करून दिलेली आहेत' असं म्हटलेलं आहे. (परिच्छेद ६.३.२.३, पृष्ठ १४८) मात्र ही पुस्तके स्वयम, दीक्षा, ई-पाठशाला पोर्टलवर आहेत, हे विधान (संदर्भ: एनसीएफएसई २०२३, परिच्छेद ६.३.२.३, पृष्ठ २०१) चुकीच्या पद्धतीने भाषांतरित केलंय. आराखड्यात सगळीकडं अशा गल्लतीची उदाहरणं आहेत. काही ठिकाणी तर मराठीत भाषांतर करण्याची तसदीदेखील घेतलेली नाही. इंग्रजीतला मूळ भाग कधी रोमन लिपीत (उदा. परिच्छेद ६.२.५- शिक्षक सक्षमीकरणासाठीच्या नावीन्यपूर्ण पद्धती) तर कधी इंग्रजीतला भाग नागरी लिपीत दिलाय (उदा. पृष्ठ १५८). अशा मांडणीमुळं 'राअआ' वाचणं ही अडथळ्यांची वाट ठरते, वाचताना वारंवार इंग्रजी आराखडा पाहावा लागतो. हे सारं निर्विचार व मध्यवर्ती सरकारकेंद्री व्यवहाराचं लक्षण म्हणायला हवं. तसं नसतं तर आपल्याकडं 'बालभारती'नं १९७० पासूनची पाठ्यपुस्तकं ऑनलाइन उपलब्ध करून दिली असल्याचा उल्लेख टाळला गेला नसता! 'एनसीईआरटी'च्या पाठ्यपुस्तकांना स्थान देणारा 'राअआ' आपल्या पाठ्यपुस्तकांकडं संसाधन म्हणून का पाहात नाही? महाराष्ट्रासारख्या (एकेकाळच्या!) प्रगत राज्यानं पाठ्यपुस्तकांसाठीदेखील आता दिल्लीकडं तोंड करावं का? राअआ'मध्ये या प्रश्नाचं उत्तर नि:संदिग्ध होकारार्थी आहे. नववी-दहावीच्या विषययोजनेत 'विज्ञान, गणित, इंग्रजी, हिंदी, व्यावसायिक शिक्षण अशा विषयांचे पाठ्यक्रम व पाठ्यपुस्तके एनसीईआरटीकडून जशीच्या तशी' घेण्याची घोषणा करण्यात आलीय. 'उच्च शिक्षणासाठी देश पातळीवर घेतल्या जाणाऱ्या प्रवेश परीक्षांची तयारी विद्यार्थ्यांना सुलभ जावी' म्हणून हा निर्णय घेतल्याचं सांगितलंय. एकेकाळी पथदर्शी ठरलेल्या 'बालभारती'ला आता 'एनसीईआरटी/ सीबीएसईच्या पाठ्यपुस्तकांच्या भाषांतराचं काम' उरलंय (राअआ, पृष्ठ ३३८-३९). देशात नावाजलेल्या 'बालचित्रवाणी'ला गेल्या कार्यकाळात नेस्तनाबूत करणाऱ्या विचारांचं सरकार आता 'बालभारती'च्या गळ्याला नख लावू पाहतंय.

## प्रासंगिक »

### अंधारा कवडसा

***सर्वोच्च न्यायालयाने निवडणूक आयोगाच्या नाकात 'आधार' कार्डाचे वेसण घातल्यामुळे विशेष मतदार याद्या पाहणीतून काय साधले, हा प्रश्न अधोरेखित झाला आहे.***

अमेरिकेतील कुख्यात वॉटरगेटप्रकरणी तत्कालीन अध्यक्ष रिचर्ड निक्सन यांची कृष्णकृत्ये चव्हाट्यावर आणणारे पत्रकार बॉब वुडवर्ड यांच्या एका लेखातील एक विधान ते काम करतात त्या 'द वॉशिंग्टन पोस्ट' या वर्तमानपत्राचे बोधवाक्य बनले. 'डेमॉक्रसी डाइज इन द डार्कनेस' हे वुडवर्ड यांचे विधान २०१७ सालातील फेब्रुवारीपासून 'पोस्ट'च्या मस्तकावर झळकू लागले. यातील फेब्रुवारी २०१७ हा तपशील महत्त्वाचा. कारण त्या महिन्यात डोनाल्ड ट्रम्प यांचा अध्यक्षीय कार्यभार सुरू झाला. त्यानंतर अमेरिकी लोकशाहीच्या ज्या चिंधड्या उडत आहेत ते पाहिल्यावर वुडवर्ड यांचे विधान आणि त्यास बोधवाक्य करण्याचा 'पोस्ट'चा निर्णय यांचा कार्यकारणभाव लक्षात यावा. स्मरण्याचे कारण म्हणजे निवडणूक आयोगाकडून खास बिहारसाठी राबवण्यात आलेल्या विशेष मतदार याद्या अद्यायावतीकरणाच्या मोहिमेची सांगता.

"मुलं फक्त परीक्षा देतात" पण फक्त शिकत राहण्याचं, फक्त परीक्षा देण्याचं एक वय असतं, सर्व शालेय शिक्षण आणि पुढे फारतर बारावीपर्यंत. ज्या मुलांची शालेय शिक्षणाचीही ऐपत नसते, पण शिकायची आवड असते, शिक्षणाचं महत्त्व समजलेलं असतं, ती मुलं शाळेच्या बरोबरीने काम करून शिकत राहतात .

# स्पर्धा परीक्षा देणं उत्तमच, पण किती काळ?

असं फक्त परीक्षांना बसणाऱ्या तरुणांची संख्या २५ लाखांच्या वर असेल आणि परीक्षा देण्याचं वय ३८ ते ४३ पर्यंत असेल; तर किती मोठ्या प्रमाणात कुशल मनुष्यबळ न वापरलं जाता, फक्त परीक्षा देत राहतं? यात समाजाचं तर नुकसान होतंच, शिवाय विविध उद्योगांनाही मनुष्यबळ मिळणं थांबतं आणि 'विद्यापीठातून नुसतीच पदवी मिळते, पण या पदवीमुळे नोकरी नाही' यावर शिक्कामोर्तब होतं. विद्यार्थी आणि त्यांच्या कुटुंबाचं तर अपरिमित नुकसान होतं. त्याविषयी विविध अहवालांत अभ्यासकांनी आपली निरीक्षणं मांडली आहेतच. मग ग्रामीण भागांतल्या विशिष्ट जाती-वर्गांतून आलेल्या मुला-मुलींनी अधिकारी होण्याची स्वप्नं पाहायचीच नाहीत का? तर तसं नाही. नक्कीच मोठं व्हायची स्वप्न पाहायची पण ए. पी. जे. अब्दुल कलाम सर म्हणतात तसं डोळे उघडे ठेवून. म्हणजे काय?मुलांच्या गावात सरकारी सोडल्या तर नोकऱ्या नाहीत, उद्योग नाहीत, शेती अवघड होऊन



बसलेली – हेच सगळे मुद्दे आहेत स्थलांतराचे हा आहे मुलांना आपल्या गावापासून दूर नेणारा 'पुश फॅक्टर'- जो आपल्याला आपल्या गावातून, आपल्या माणसांतून, आपल्या जमिनीतून उठून दूर जाण्यास भाग पाडतो. नोकऱ्या, उद्योग, विविध संधी, सुविधा हे असतात स्थलांतराचे 'पुल फॅक्टर्स', जे मुलांना शहरांत जाण्यास भाग पाडतात. मग आता 'डोळे उघडे ठेवून स्वप्न पाहायची' म्हणजे काय करायचं? बरं डोळे फक्त विद्यार्थ्यांनी उघडे ठेवल्याने काम भागेल? तर तसं नाही. सरकारने, उद्योगांनी आणि विद्यापीठांनीही डोळे सताड उघडे ठेवले पाहिजेत. सरकारने वेळेवर परीक्षा घेऊन, वेळेवर भरतीचे आदेश काढून; तर उद्योगांनी अविकसित भागांत उद्योगांची निदान एखादी तरी शाखा सुरू करून! – जे उद्योग अविकसित भागांत अशी शाखा सुरू करून स्थानिकांना रोजगार देतील त्यांना इन्कम टॅक्स/जीएसटी किंवा इतर टॅक्समध्ये सवलत देऊन किंवा कपात करून सरकारकडून प्रोत्साहन मिळालं पाहिजे. एनईपी २०२० मध्ये ज्याप्रमाणे म्हटले आहे त्याप्रमाणे कौशल्याधारित शिक्षण विद्यापीठांनी दिलं पाहिजे. अशा परीक्षांचे जे क्लासेस पुणे-मुंबई-दिल्लीत आहेत, त्यातले काही क्लासेस या मुलांना जवळ असतील अशा ठिकाणी सुरू केले पाहिजेत. त्यात 'आर्थिक फायदा नाही, अडचणी जास्त आहेत' असे असले तरी मोठ्या प्रमाणात तरुणाईला विस्थापित न करता, चांगले मार्गदर्शन देण्याचे काम तरी होईल. लिहिणं सोपं आहे की, 'सरकारने यांव करावं व उद्योगांनी त्यांव करावं, विद्यापीठाने असं तर क्लासेसने तसं.' पण आपल्या कुणाकडेच हे घडवून आणण्या एवढी क्षमता नाही. आपण फक्त अपेक्षा करू शकतो.

## ।। अभंगवाणी ।।



आजिवरी तुम्हां आम्हां नेणपण ।
कौतुकें खेळणें संग होता ॥१॥

आतां अनावर जालें अगुणाची ।
करूं नये तें चि करीं सुखें ॥२॥

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे- पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे- 411018 येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजिटल स्वरुपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव । मुख्य कार्यकारी संपादक : सुनील आढाव.** (*सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील) विशेष सूचना: हा अंक कोणत्याची प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

कृष्णा सहकारी साखर कारखाना

काळाबरोबर चालत शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाचे निर्णय

# कृष्णा साखर कारखान्याची आधुनिकतेकडे झेप!

## शेतकऱ्यांच्या हितासाठी एआय तंत्रज्ञान, जलसिंचन योजनांचे आधुनिकीकरण

। सांगली ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**कराड तालुक्यातील यशवंतराव मोहिते कृष्णा सहकारी साखर कारखान्याने काळाबरोबर चालत शेतकऱ्यांच्या हितासाठी महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. कारखान्याच्या ६९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत अध्यक्ष डॉ. सुरेश भोसले यांनी शेतीमध्ये कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) तंत्रज्ञानाचा वापर करून ऊस उत्पादन वाढवण्यावर भर देण्याची घोषणा केली. याचबरोबर कारखाना मालकीच्या आणि पुरस्कृत उपसा जलसिंचन योजनांचे आधुनिकीकरण करण्याचा संकल्पही त्यांनी व्यक्त केला. शासनाने या योजनांना मदतीचा हात दिल्यास शेतकऱ्यांना पाणीपट्टीत मोठा दिलासा मिळेल, असा विश्वासही त्यांनी यावेळी व्यक्त केला.**





### तंत्रज्ञानावर भर– शेतीचा नवा मार्ग

परंपरागत शेतीपद्धतीत सातत्याने वाढणाऱ्या खर्चामुळे आणि हवामानातील बदलांमुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न धोक्यात आले आहे. अशा परिस्थितीत एआय तंत्रज्ञानाचा वापर हा शेतकऱ्यांसाठी गेमचेंजर ठरू शकतो. हवामानाचा अंदाज, जमिनीतील आर्द्रता, पाणी व्यवस्थापन, खतांचा योग्य वापर या सर्व बाबींचे रिअल टाइम विश्लेषण एआयच्या साहाय्याने शक्य होते. कारखान्याच्या माध्यमातून हे तंत्रज्ञान गावोगावी पोहोचल्यास ऊस पिकाची उत्पादकता वाढवता येईल, खर्च कमी होईल आणि शेतकऱ्यांना अधिक दरात ऊस विकता येईल.

### जलसिंचन योजनांचे आधुनिकीकरण

कृष्णा कारखान्याच्या कार्यक्षेत्रात उपसा जलसिंचन योजना महत्त्वाची भूमिका बजावत आहे. मात्र कालबाह्य यंत्रणा, वाढलेला वीजखर्च आणि बदलत्या हवामानामुळे या योजना आर्थिकदृष्ट्या तोट्यात जात आहेत. डॉ. भोसले यांनी या योजनांचे आधुनिकीकरण करण्याची घोषणा करताना शासनाकडून मदतीची अपेक्षा व्यक्त केली. ही मदत मिळाल्यास सभासदांना पाणीपट्टीचा भार कमी होईल, ही मोठी दिलासादायक बाब आहे. ऊस पिकाच्या स्थिरतेसाठी सिंचन हीच मुख्य किल्ली असल्याने हा निर्णय दूरगामी ठरणार आहे.

### पारदर्शक कारभार, शेतकरी विश्वास

आमदार डॉ. अतुल भोसले यांनी गेल्या दहा वर्षांतील कारखान्याच्या कारभाराचा आढावा घेताना संचालक मंडळाने एफआरपीपेक्षा शेतकऱ्यांना तब्बल एकशे चौतीस कोटी रुपये जास्त दिल्याचा उल्लेख केला. शिवाय शेतकऱ्यांना मोफत साखरेच्या स्वरूपात एकोणसत्तर कोटी रुपये दिले गेले आहेत. एफआरपीपेक्षा जास्त दर दिल्याने आलेली आयकर विभागाची पाचशे कोटी रुपयांची नोटीस केंद्र सरकारशी चर्चा करून रद्द करण्यात आली. या सर्व उपक्रमांमुळे शेतकऱ्यांचा विश्वास कारखान्यावर अधिक दृढ झाला आहे. कृष्णा साखर कारखान्याचा प्रवास हा सहकार क्षेत्रातील नवे आदर्श निर्माण करणारा ठरत आहे. परंपरेबरोबर तंत्रज्ञानाचा योग्य संगम साधणे, शेतकऱ्यांना चांगला दर देणे तसेच ऊसतोडी वेळेत होणे आणि पारदर्शक कारभार या तिन्ही आघाड्यांवर कारखाना सक्षमपणे उभा आहे. एआयच्या माध्यमातून उत्पादन वाढवण्याची कल्पना ही केवळ आधुनिक नाही तर ऊस शेतीतील भविष्यातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आवश्यक आहे. जलसिंचन योजनांचे आधुनिकीकरण ही दुसरी महत्त्वाची पायरी असून पाणी व्यवस्थापनाच्या अडचणी सोडवण्यासाठी हा निर्णय निर्णायक ठरू शकतो. सहकारी संस्थांनी फक्त नफ्यावर न थांबता शेतकऱ्यांच्या सर्वांगीण प्रगतीचा विचार करणे हीच खरी सहकार चळवळीची ताकद आहे. कृष्णा कारखान्याचा हा दूरदृष्टीचा दृष्टिकोन पुढील काळात इतर सहकारी संस्थांसाठी मार्गदर्शक ठरणार, याबद्दल शंका नाही.

# महाराष्ट्रातील इंधनाचे नवे दर जाहीर

## महाराष्ट्रातील तुमच्या शहरांतील 1 लिटर पेट्रोलची किंमत किती?

। मुंबई ।

प्रतिनिधी : महाईन्यूज

**पेट्रोल आणि डिझेल हा सर्वसामान्यांसाठी जिव्हाळ्याचा विषय आहे. अनेक सर्वसामान्य तर पेट्रोल आणि डिझेलच्या दरावरुन महागाई वाढली आहे की नाही याचे अंदाज लावत असतात.**




आज ०१ ऑक्टोबर २०२५ रोजी पेट्रोल व डिझेलचे नवीन दर जाहीर झाले आहेत. इंधनाचे दर सकाळी सहा वाजता जाहीर केले जातात आणि मग ते सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवले जातात. तर आज तुमच्या शहरांत इंधनाची किंमत काय, हे तुम्ही खाली दिलेल्या तक्त्यात तपासून घेऊ शकता.पेट्रोल-डिझेलचा दर (PETROL DIESEL PRICE IN MARATHI) आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या किमतीत चढ-उतार होत असतात आणि त्यानुसार पेट्रोल व डिझेलचे दर बदलत राहतात. पेट्रोल-डिझेलच्या किमती व्हॅट, मालवाहतूक शुल्क, स्थानिक कर इत्यादी घटकांवर अवलंबून असते. तर तक्त्यात नमूद केल्याप्रमाणे पेट्रोल व डिझेलचा आजचा महाराष्ट्रातील इंधनाचे दर कमी झाल्याचे पाहायला मिळाले आहेत. देशभरात पेट्रोल आणि डिझेलच्या नवीन किमती जाहीर करण्यात आल्या आहेत. कच्च्या तेलाच्या आंतरराष्ट्रीय किमतींनुसार भारतात इंधनाची किंमत ठरवली जाते. तर तुम्ही तुमच्या शहरातील पेट्रोल आणि डिझेलचे दर एसएमएसद्वारे देखील जणून घेऊ शकता. यासाठी तुम्ही इंडियन ऑइल ग्राहक RSP या क्रमांकावर पाठवू शकतात.

### भारतात इंधनाची किंमत ठरवली

BPCL ग्राहक ९२२३११२२२२ या क्रमांकावर RSP<डीलर कोड> पाठवू शकतो. इंधनाचे दर सकाळी सहा वाजता जाहीर केले जातात आणि मग ते सामान्य नागरिकांपर्यंत पोहचवले जातात. तर आज तुमच्या शहरांत इंधनाची किंमत काय, हे तुम्ही खाली दिलेल्या तक्त्यात तपासून घेऊ शकता.

## लोकसंख्या बदलाचा धोका — संघाच्या शताब्दी कार्यक्रमात पंतप्रधान मोदी यांचा इशारा

# लोकसंख्या रचनेतील बदलाचा धोका!

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**'राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने १०० वर्षांच्या प्रवासात अनेक कट-कारस्थाने, भीषण छळ, अन्याय सहन केला. पण, स्वयंसेवकांमध्ये कधीही कोणाही विरोधात कटुता आली नाही', असे उद्गार पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी काढले. तसेच, देशासमोरील आव्हाने स्पष्ट करताना, 'लोकसंख्येच्या रचनेत होत असलेला बदल हा सामाजिक ऐक्यासाठी घुसखोरीपेक्षाही मोठा धोका आहे, असा इशाराही मोदींनी दिला.**

### १०० रुपयांचे स्मृतिचिन्ह नाणे प्रकाशित



दिल्लीतील बुधवारी झालेल्या कार्यक्रमामध्ये, संघाच्या शताब्दीनिमित्त केंद्र सरकारच्या वतीने विशेष टपाल तिकीट आणि १०० रुपयांचे स्मृतिचिन्ह नाणे प्रकाशित करण्यात आले. नाण्याच्या एका बाजूस राष्ट्रीय चिन्ह असून दुसऱ्या बाजूस वरद मुद्रा धारण केलेली भारतमाता, सिंह आणि तिला वंदन करणारे स्वयंसेवक दर्शविले आहेत. या वैशिष्ट्यांचा मोदींनी विशेष उल्लेख केला. केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे उपस्थित होते.देशासमोर एकता, संस्कृती आणि सुरक्षिततेला थेट धोका निर्माण केला जात आहे. त्याचा सावध राहून सामना करण्याची गरज आहे. तसे झाले नाही तर 'विविधतेतील एकता' हा देशाचा आत्माच धोक्यात येईल. त्यामुळे हे तत्त्व मोडू न देता ते अधिक बळकट कसे होईल याकडे लक्ष दिले पाहिजे, असे ते म्हणाले. भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना नव्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. संघाने केवळ ही आव्हाने ओळखली नाहीत तर, त्यांचा सामना करण्यासाठी ठोस रोडमॅप तयार केला आहे, असे मोदींनी सांगितले. शंभर वर्षांच्या संघाच्या कार्याचे कौतुक मोदींनी यावेळी केले.या दोन्ही मुद्द्यांचा ऊहापोह त्यांनी स्वातंत्र्यदिनीच्या लालकिल्ल्यावरील भाषणातही केला होता. मोदींनी लोकसंख्येच्या रचनेतील बदलाविरोधात मोहीम राबवली जाणार असल्याची घोषणाही त्यांनी केली होती. घुसखोर देशातील तरुणांचे रोजीरोटी हिरावून घेत आहेत. देशातील बहिणी आणि मुलींना लक्ष्य करत आहेत, आदिवासींची दिशाभूल करतात आणि त्यांच्या जमिनी बळकावतात. देश ही घुसखोरी सहन करणार नाही, असे मोदी म्हणाले होते.दिल्लीतील बुधवारी झालेल्या कार्यक्रमामध्ये, संघाच्या शताब्दीनिमित्त केंद्र सरकारच्या वतीने विशेष टपाल तिकीट आणि १०० रुपयांचे स्मृतिचिन्ह नाणे प्रकाशित करण्यात आले.

### एकता' हा देशाचा आत्मा

दिल्लीतील बुधवारी झालेल्या कार्यक्रमामध्ये, संघाच्या शताब्दीनिमित्त केंद्र सरकारच्या वतीने विशेष टपाल तिकीट आणि १०० रुपयांचे स्मृतिचिन्ह नाणे प्रकाशित करण्यात आले. नाण्याच्या एका बाजूस राष्ट्रीय चिन्ह असून दुसऱ्या बाजूस वरद मुद्रा धारण केलेली भारतमाता, सिंह आणि तिला वंदन करणारे स्वयंसेवक दर्शविले आहेत. या वैशिष्ट्यांचा मोदींनी विशेष उल्लेख केलासंघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे उपस्थित होते

नाण्याच्या एका बाजूस राष्ट्रीय चिन्ह असून दुसऱ्या बाजूस वरद मुद्रा धारण केलेली भारतमाता, सिंह आणि तिला वंदन करणारे स्वयंसेवक दर्शविले आहेत. या वैशिष्ट्यांचा मोदींनी विशेष उल्लेख केला. केंद्रीय संस्कृती मंत्री गजेंद्रसिंह शेखावत, दिल्लीच्या मुख्यमंत्री रेखा गुप्ता, संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेय होसबळे उपस्थित होते.देशासमोर एकता, संस्कृती आणि सुरक्षिततेला थेट धोका निर्माण केला जात आहे. त्याचा सावध राहून सामना करण्याची गरज आहे. तसे झाले नाही तर 'विविधतेतील एकता' हा देशाचा आत्माच धोक्यात येईल. त्यामुळे हे तत्त्व मोडू न देता ते अधिक बळकट कसे होईल याकडे लक्ष दिले पाहिजे, असे ते म्हणाले. भारताला जगातील तिसरी सर्वात मोठी अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेने वाटचाल करत असताना नव्या आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. संघाने केवळ ही आव्हाने ओळखली नाहीत तर, त्यांचा सामना करण्यासाठी ठोस रोडमॅप तयार केला आहे, असे मोदींनी सांगितले. शंभर वर्षांच्या संघाच्या कार्याचे कौतुक मोदींनी यावेळी केले.या दोन्ही मुद्द्यांचा ऊहापोह त्यांनी स्वातंत्र्यदिनीच्या लालकिल्ल्यावरील भाषणातही केला होता.मोदींनी लोकसंख्येच्या रचनेतील बदलाविरोधात मोहीम राबवली जाणार असल्याची घोषणाही त्यांनी केली होती. घुसखोर देशातील तरुणांचे रोजीरोटी हिरावून घेत आहेत. देशातील बहिणी आणि मुलींना लक्ष्य करत आहेत, आदिवासींची दिशाभूल करतात.

# केंद्राकडून महागाई भत्त्यात वाढ

## शेतकऱ्यांना नव्या डाळींच्या जातींचे मोफत बियाणे वाटणार

। नवी दिल्ली ।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**केंद्रीय मंत्रिमंडळाने केंद्रीय कर्मचाऱ्यांचा महागाई भत्ता व निवृत्तीधारकांच्या महागाई भरपाईमध्ये ३ टक्के वाढ मंजूर केली आहे. सुधारित भत्ता दर १ जुलैपासून लागू होतील. त्यानुसार भत्ता व भरपाई आता मूळ वेतन व निवृत्तिवेतनाच्या ५८ टक्के असेल, अशी माहिती केंद्रीय माहिती व प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत दिली.**



या महागाई भत्तावाढीचा सुमारे ४९.१९ लाख कर्मचारी आणि ६८.७२ लाख निवृत्तीधारकांना फायदा होणार असून त्याचा सरकारी तिजोरीवर १०,०८३.९६ कोटी रुपयांचा बोजा पडणार आहे. महागाई भत्ता-भरपाईवाढ सातव्या केंद्रीय वेतन आयोगाच्या शिफारशींवरील आधारित सूत्रानुसार केली जाते. जुलै ते सप्टेंबर या महिन्यांचे भत्ते ऑक्टोबरच्या पगारासह दिले जातील, असेही त्यांनी सांगितले. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्राच्या आर्थिक व्यवहार समितीने २०२६-२७ वर्षासाठी रब्बी हंगामातील पिकांच्या हमीभावात वाढ केली.

### वंदे मातरमचा उत्सव

वंदे मातरम् या राष्ट्रीय गीताला दीडशे वर्षे पूर्ण होत असल्याने देशभर साजरे करण्याचा निर्णय केंद्रीय मंत्रिमंडळाने घेतला. केंद्रीय मंत्री अश्विनी वैष्णव यांनी याबाबत माहिती दिली. संविधान सभेने बंकिमचंद्र चटर्जी यांनी रचलेल्या वंदे मातरमला राष्ट्रीय गीताचा दर्जा दिला होता. स्वातंत्र्य आंदोलनात या गीताने स्फूर्ती दिली होती. यामुळे देशभर विविध कार्यक्रमांचे आयोजन केले जाणार असल्याचे वैष्णव यांनी स्पष्ट केले.

सूर्यफुलाच्या हमीभावात (६५४० रुपये) प्रति क्विंटल सर्वाधिक ६०० रुपये वाढ करण्यात आली. मसूर ३०० (हमीभाव ७ हजार), मोहरी २५० (६२००), हरभरा २२५ (५८७५), सातू-जव १७० (२१५०), तर गव्हासाठी १६० (२५८५) रुपयांची वाढ करण्यात आली.डाळींच्या उत्पादनातील आत्मनिर्भरतेसाठी केंद्र सरकार नवी मोहीम राबवणार आहे. डाळींच्या या नव्या मिशनअंतर्गत २०३०-३१ पर्यंत उत्पादन ३५० लाख टनपर्यंत वाढवण्याचे लक्ष्य ठेवले आहे.कोटींची गुंतवणूक केली जाणार आहे.

# ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ पोहोचली ऑस्ट्रेलियात!

‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ हा कार्यक्रम घराघरांत लोकप्रिय आहे. यामधील प्रत्येक विनोदवीर प्रेक्षकांना आपलासा वाटतो. हास्यजत्रेमुळे अनेक नवोदित कलाकारांना एक वेगळी ओळख मिळाली. परदेशातील प्रेक्षकांना सुद्धा या कार्यक्रमाची तुफान क्रेझ आहे. त्यामुळे हास्यजत्रेची टीम अनेकदा परदेश दौऱ्यावर जाऊन तेथील प्रेक्षकांचं मनोरंजन करत असते. गेल्यावर्षी ही संपूर्ण टीम अमेरिका दौऱ्यावर गेली होती. आता यंदाच्या वर्षी महाराष्ट्राला खळखळून हसवणारे हे विनोदवीर ऑस्ट्रेलियात पोहोचले आहेत. ‘महाराष्ट्राची हास्यजत्रा’ची संपूर्ण टीम ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर गेली असून याठिकाणी सिडनी, मेलबर्न अशा महत्त्वाच्या शहरांमध्ये हे कलाकार लाइव्ह परफॉर्म करणार आहेत. विनोदवीरांसह या कार्यक्रमाची सूत्रसंचालिका अभिनेत्री प्राजक्ता माळी देखील ऑस्ट्रेलियात पोहोचली आहे. याठिकाणी या संपूर्ण टीमने मिळून एका ट्रेंडिंग गाण्यावर जबदस्त डान्स केला. याचा खास व्हिडिओ प्राजक्ताने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. ऑस्ट्रेलियाच्या समुद्रकिनारी प्राजक्तासह पृथ्वीक प्रताप, सचिन मोटे, समीर चौघुले, नम्रता संभेराव, वनिता खरात, प्रसाद खांडेकर, ओंकार राऊत, चेतना भट या सगळ्या कलाकारांनी मिळून “कुडिये नी...” या लोकप्रिय गाण्यावर डान्स केला.“आम्ही ऑस्ट्रेलियात एकत्र अशी मजा करतोय... सचिन मोटे सर सुद्धा सामील झाले, याचा विशेष आनंद!

# सुमीत पुसावळेचं कुटुंबीयांसह सेलिब्रेशन

‘स्टार प्रवाह’ वाहिनीवर लवकरच ‘घरोघरी मातीच्या चुली’ ही नवी मलिका सुरू होणार आहे. अभिनेत्री रेश्मा शिंदे, सविता प्रभुणे, प्रमोद पवार, उदय नेने, आरोही सांबरे अभिनीत ही मालिका १८ मार्चपासून संध्याकाळी ७.३० वाजता पाहायला मिळणार आहे. या मालिकेत हृषिकेश या प्रमुख भूमिकेसाठी अभिनेता सुमीत पुसावळेची वर्णी लागली आहे. याआधी सुमीत ‘बाळूमामाच्या नावानं चांगभलं’ या मालिकेत झळकला होता. पण आता मालिकेतून त्याने एक्झिट घेत तो नव्या रुपात भेटीस येणार आहे. अलीकडेच अभिनेता सुमीत पुसावळे ‘घरोघरी मातील चुली’ या मालिकेत झळकणार असल्याचं जाहीर झालं. तेव्हापासून तो चर्चेत आला आहे. सुमीतने या नव्या प्रवासानिमित्ताने कुटुंबियांबरोबर सेलिब्रेशन केलं. याचा व्हिडीओ अभिनेत्याची बायको मोनिका पुसावळेने इन्स्टाग्रामवर शेअर केला आहे. याशिवाय मोनिकाने सुमीतसाठी इन्स्टाग्राम स्टोरीवरही खास पोस्ट लिहिल्या होत्या.‘बाळूमामांच्या नावानं चांगभलं’ या मालिकेतील सुमीतचा प्रवास संपल्याच्यानिमित्ताने मोनिकाचे काही फोटो शेअर करत पोस्ट लिहिली. मोनिकाने लिहिलं की, सुमीत तुझ्या कामाबद्दलचं प्रेम, निष्ठा, मामांवरचं प्रेम, विश्वास हे सगळं मी खूप जवळून अनुभवलं आहे. तू मामांचं कार्य घराघरात पोहोचवलं. उन्ह असो, पाऊस असो कधी तू आणि तुझी टीम थांबली नाही. मला आज बायको म्हणून खूप अभिमान वाटतोय. तुला प्रत्येकाने जे प्रेम दिलं आहे ते असंच कायम राहो आणि तुझ्या मनातल्या सर्व इच्छा पूर्ण व्हावी हिच मामांच्या चरणी प्रार्थना.

# साराची सर्वोत्कृष्ट भूमिका?

सारा अली खान नावाच्या अभिनेत्रीची आजवरची सर्वोत्कृष्ट भूमिका म्हणून तिच्या ए वतन मेरे वतन नावाच्या चित्रपटाचे नाव सांगावे लागेल. अशा प्रकारच्या प्रतिक्रिया सोशल (AE WATAN MERE WATAN TRAILER NEWS) मीडियावर नेटकऱ्यांकडून येत आहेत. त्याला कारण या चित्रपटाचा व्हायरल झालेला ट्रेलर. बऱ्याच दिवसांपासून या चित्रपटाच्या ट्रेलरची चर्चा रंगली आहे. गेल्या वर्षी सारानं तिच्या चित्रपटांनं नेटकऱ्यांचे, चाहत्यांचे लक्ष वेधून घेतले होते. तिचा विकी कौशल सोबत प्रदर्शित झालेला चित्रपटही चर्चेचा (SARA ALI KHAN VIRAL NEWS) विषय होता. या सगळ्यात ॲमेझॉन प्राईमवर प्रदर्शित होणाऱ्या या चित्रपटातून साराचा एक वेगळाच अंदाज दिसून येतो. भारताला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीचा तो काळ. इंग्रजांची ती जुलमी राजवट मोडून काढण्यासाठी वेगवेगळ्या पद्धतीनं मोहिमा सुरु होत्या. त्यातील एका मोहिमेचं प्रतिनिधीत्व सारा अली खान करते आहे.मेरे वतन हा अशा एका महिलेची कथा सांगतो जिनं तिच्या धाडसीपणानं देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यात महत्वाची भूमिका साकारली आहे. या चित्रपटामध्ये सारानं उषा नावाच्या मुलीची भूमिका वठवली असून त्यात तिचा स्वातंत्र्याप्रतीचा संघर्ष दिसून आला आहे. १९४२ साली भारत छोडो जे आंदोलन छेडले गेले त्यात भूमीगत राहून रेडिओ स्टेशन चालवण्याचे काम उषानं केलं होतं. ते हे या चित्रपटातून दिसून येते. ट्रेलरच्या सुरुवातीला दिसते की, सारा अली खान ही हातात तिरंगा घेतलेली दिसते.



# अरेंज मॅरेजमधून उलगडणार लव्ह स्टोरी

लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वेने नेहमीच चर्चेत असते. ‘देवयानी’ या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी ‘ऊन सावली’ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे. नुकताच या चित्रपटाचा ट्रेलर प्रदर्शित करण्यात आला. ‘ऊन सावली’ हा चित्रपट प्रणय आणि आन्वीची प्रेमकथा आहे. ‘एक अरेन्ज मॅरेज ही अद्भुत लव स्टोरी असू शकते’ ह्या वाक्यात ‘ऊन सावलीचे’ गूढ लपलेले आहे. एकमेकांच्या डोळ्यात डोळे घालून पाहणारे हे सुंदर जोडपं बरच काही सांगू पाहत आहे, बरच काही बोलू इच्छित आहेत. पहिल्या भेटीतच प्रणयला आन्वी आवडते. परंतु आन्वीचा विरोध हा कायम आहे. तिच्या मनात तर वेगळाच गोंधळ चालू आहे. हा चित्रपट लग्न करणाऱ्या प्रत्येक व्यक्तीला स्वतःशी जोडणारा आहे.तिकीट विंडो पिक्चर्स बॅनरअंतर्गत समीर ए शेखद्वारा या चित्रपटाची निर्मिती करण्यात आली आहे. सार्थक नकुल यांनी या चित्रपटाला संगीत दिले आहे. या चित्रपटात भूषण व शिवानीबरोबर अजिंक्य ननावरे, राज सरनागत, अंकिता भोईर, विकास हांडे, श्वेता कामत, प्रिया तुळजापूरकर आणि मनाली निकम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. येत्या १५ मार्चला हा चित्रपट प्रदर्शित होणार आहे. लोकप्रिय मराठमोळी अभिनेत्री शिवानी सुर्वेने नेहमीच चर्चेत असते. ‘देवयानी’ या मालिकेतून शिवानी घराघरांत पोहचली. काही महिन्यांपूर्वीच तिचा झिम्मा २ चित्रपट प्रदर्शित झाला. प्रेक्षकांकडून या चित्रपटाला भरभरून प्रतिसादम मिळाला होता. मराठीबरोबर शिवानीने हिंदी मालिकांमध्ये आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला. आता लवकरच शिवानी ‘ऊन सावली’ चित्रपटातून प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात तिच्याबरोबर भूषण प्रधानची प्रमुख भूमिका आहे.

# माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते

मनिषा राणी ही आता झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनची विजेती झाली आहे. त्यानंतर तिची पहिली प्रतिक्रिया समोर आली आहे. गेल्या काही दिवसांपासून तिच्या नावाची जोरदार चर्चा होती. अखेर तिच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आले आहे. सोशल मीडियावर एक दिवस अगोदरच मनिषाचं नाव विजयी म्हणून समोर आले होते. टीव्ही मनोरंजन क्षेत्रात गेल्या काही वर्षांपासून सुरु असणाऱ्या रियॅलिटी शो मध्ये झलक दिखला जा चे नाव घेता येईल. या रियॅलिटी शो चा अकरावा सीझन पार पडला असून त्यातील सहभागी स्पर्धकांविषयी चाहत्यांना कमालीची उत्सुकता असल्याचे दिसून आले आहे. अशातच मनिषा राणीनं विजेतपद मिळवल्यानंतर तिनं दिलेल्या प्रतिक्रियेनं नेटकऱ्यांच्या चर्चेला उधाण आले आहे. सोशल मीडियावर मनिषाच्या नावाची चर्चा आहे. ती विजयी होताच तिच्याव चाहत्यांनी, नेटकऱ्यांनी कौतुकाचा वर्षाव केला आहे. या सगळ्यात मनिषाची प्रतिक्रिया देखील चर्चेत आली आहे. ती नेमकी काय म्हणाली हेही आपण जाणून घेऊयात. मनिषाला झलक दिखला जा चे विजेतेपद मिळवल्यानंतर तिला ३० लाख रुपयांचे बक्षीस देण्यात आले. त्यानंतर तिनं इंस्टावरुन चाहत्यांचे आभार मानले आहेत. तिनं म्हटलं आहे की, मी माझ्या सर्व चाहत्यांचे खूप आभार मानते. त्यांच्या मुळेच हा प्रवास शक्य झाला. त्यांनी केलेल्या सहकार्याविषयी मी त्यांची आभारी आहे.त्या व्हिडिओच्या शेवटी ती म्हणते की, मी आता जे काही पाहते आहे ते सगळं खरं आहे यावर माझा विश्वासच बसत नाही. माझ्यासाठी एक ते दीड लाख वोटिंग एका दिवसांत आली. मला एवढं प्रेम मिळालं हेच माझ्यासाठी खूप आहे. लोकांनी मला जे खूप सहकार्य केले त्यासाठी त्यांना धन्यवाद. अशा शब्दांत मनीषा राणीनं तिच्या भावना व्यक्त केल्या आहेत.टीव्ही मनोरंजन विश्वातील प्रसिद्ध रियॅलिटी शो झलक दिखला जा च्या अकराव्या सीझनचा ग्रँड सीझन नुकताच पार पडला.त्याला बॉलीवूडमधील प्रसिद्ध अभिनेत्री हुमा कुरेशी हजर होती. यावेळी बिग बॉसच्या १७ व्या सीझनचा विजेता मुनव्वर देखील उपस्थित होता. या सगळ्यात एका व्हिडिओनं नेटकऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. मनीषा राणीनं यंदाच्या झलक दिखजा चे विजेतेपद मिळवून आपल्या नावाची वेगळी ओळख निर्माण केली आहे. बऱ्याच दिवसांपासून झलक दिखला जा ची चर्चा होती. अखेर त्याचा यंदाचा सीझन संपला असून त्यानं चाहत्यांचा निरोप घेतला आहे. या सगळ्यात शेवटच्या एपिसोडमध्ये चर्चा रंगली होती ती हुमा कुरेशी आणि मुनव्वर फारुखीची. त्यानं तिची टिंगल केल्याचे दिसून आले आहे.



**मोठा विक्रम मोडला**

## अभिषेकने ९३१ रेटींग पॉईंट्सचा आकडा गाठला

# अभिषेक शर्माने मोडला मोठा विक्रम!

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**आशिया चषक २०२५ स्पर्धेत युवा फलंदाज अभिषेक शर्माच्या फलंदाजीचा बोलबाला पाहायला मिळाला आहे. पहिल्यांदाच मोठी स्पर्धा खेळण्यासाठी मैदानात उतरलेल्या अभिषेक शर्माने गोलंदाजांची चांगलीच धुलाई केली. चौकार- षटकारांचा पाऊस पाडत त्याने या स्पर्धेत सर्वाधिक धावा करण्याचा मान पटकावला. यासह तो मालिकावीर पुरस्काराचा मानकरी देखील ठरला.**

### ७७ डावात १८१६ धावा केल्या



दरम्यान या कामगिरीचा त्याला आयसीसी टी-२० फलंदाजांच्या रँकिंगमध्ये चांगलाच फायदा झाला आहे. अभिषेक शर्मा हा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जास्त रेटींग पॉईंट्स मिळवणारा फलंदाज ठरला आहे. यासह त्याने अनेक दिग्गज फलंदाजांना मागे टाकलं आहे. आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या रँकिंगमध्ये कुठल्याही फलंदाजाला ९२० रेटींग पॉईंट्सचा आकडा देखील गाठता आलेला नाही. पण २५ वर्षीय अभिषेक शर्माने ९३१ रेटींग पॉईंट्सचा आकडा गाठला आहे. हा आकडा गाठणारा तो क्रिकेट इतिहासातील पहिलाच फलंदाज ठरला आहे. याआधी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आयसीसीची सर्वोच्च रेटींग ९१९ होती. हा विक्रम इंग्लंडचा स्फोटक फलंदाज डेव्हिड मलानच्या नावावर होता. आता अभिषेक शर्माने हा रेकॉर्ड तर मोडला,यासह असा रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे ज्या रेकॉर्डपर्यंत पोहोचणं मुळीच सोपं नाही.भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने टी-२० आंतरराष्ट्रीय रँकिंगमध्ये अव्वल स्थानी असताना ९१२ रेटींग पॉईंट्स मिळवले होते. तो सर्वाधिक रेटींग मिळवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे. तर विराट कोहली या यादीत चौथ्या स्थानी जाऊन पोहोचला आहे. ९०९ हे विराटने मिळवलेले सर्वोच्च रेटींग पॉईंट्स आहेत. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार आरोन फिंच या यादीता पाचव्या स्थानी आहे.त्याने ९०४ रेटींग पॉईंट्स मिळवले होते. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम या यादीत सहाव्या स्थानी पोहोचला आहे. बाबरने ९०० रेटींग पॉईंट्सपर्यंत मजल मारली होती.देशांतर्गत क्रिकेटमध्ये पंजाब संघाचं प्रतिनिधित्व करणाऱ्या अभिषेक शर्माने जुलै २०२४ मध्ये झिम्बाब्वेविरूद्ध झालेल्या सामन्यातून आपल्या टी-२० कारकिर्दीची सुरूवात केली होती. या मालिकेत त्याने दमदार शतक झळकावलं होतं. त्याला आतापर्यंत टी-२० आंतराराष्ट्रीय क्रिकेटमध्ये २४ सामने खेळण्याची संधी मिळाली आहे. यादरम्यान त्याने १३५ च्या स्ट्राईक रेटने फलंदाजी करताना ८४९ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने २ शतकं आणि ५ अर्धशतकं झळकावली आहेत. तर आयपीएल स्पर्धेत फलंदाजी करताना त्याने ७७ डावात १८१६ धावा केल्या आहेत. यादरम्यान त्याने १ शतक आणि ९ अर्धशतक झळकावले आहेत. दरम्यान या कामगिरीचा त्याला आयसीसी टी-२० फलंदाजांच्या रँकिंगमध्ये चांगलाच फायदा झाला आहे. अभिषेक शर्मा हा टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये सर्वात जास्त रेटींग पॉईंट्स मिळवणारा फलंदाज ठरला आहे. यासह त्याने अनेक दिग्गज फलंदाजांना मागे टाकलं आहे. आयसीसी टी-२० आंतरराष्ट्रीय फलंदाजांच्या रँकिंगमध्ये कुठल्याही फलंदाजाला ९२० रेटींग पॉईंट्सचा आकडा देखील गाठता आलेला नाही. पण २५ वर्षीय अभिषेक शर्माने ९३१ रेटींग पॉईंट्सचा आकडा गाठला आहे. हा आकडा गाठणारा तो क्रिकेट इतिहासातील पहिलाच फलंदाज ठरला आहे. याआधी टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये आयसीसीची सर्वोच्च रेटींग ९१९ होती. हा विक्रम इंग्लंडचा स्फोटक फलंदाज डेव्हिड मलानच्या नावावर होता. आता अभिषेक शर्माने हा रेकॉर्ड तर मोडला,यासह असा रेकॉर्ड प्रस्थापित केला आहे ज्या रेकॉर्डपर्यंत पोहोचणं मुळीच सोपं नाही.भारतीय टी-२० संघाचा कर्णधार सूर्यकुमार यादवने टी-२० आंतरराष्ट्रीय रँकिंगमध्ये अव्वल स्थानी असताना ९१२ रेटींग पॉईंट्स मिळवले होते. तो सर्वाधिक रेटींग मिळवणाऱ्या फलंदाजांच्या यादीत तिसऱ्या स्थानी पोहोचला आहे.

### फिंच यादीत पाचव्या स्थानी

तर विराट कोहली या यादीत चौथ्या स्थानी जाऊन पोहोचला आहे. ९०९ हे विराटने मिळवलेले सर्वोच्च रेटींग पॉईंट्स आहेत. ऑस्ट्रेलियाचा माजी कर्णधार आरोन फिंच या यादीता पाचव्या स्थानी आहे.त्याने ९०४ रेटींग पॉईंट्स मिळवले होते. पाकिस्तानचा कर्णधार बाबर आझम या यादीत सहाव्या स्थानी पोहोचला आहे. बाबरने ९०० रेटींग पॉईंट्सपर्यंत मजल मारली होती.

# लिव्हरपूलला पुन्हा पराभवाचा धक्का

## चॅम्पियन्स फुटबॉल गॅलतासराय पराभूत; रेयाल, बायर्नचा विजय

।नवी दिल्ली।
वृत्तसंस्था : महाईन्यूज

**यंदाच्या हंगामाची दमदार सुरुवात केल्यानंतर बलाढ्य लिव्हरपूल फुटबॉल क्लबला एकाच आठवड्यात दोन पराभवांचा सामना करावा लागला आहे. प्रीमियर लीगमध्ये क्रिस्टल पॅलेसकडून हार पत्करल्यानंतर लिव्हरपूलला चॅम्पियन्स लीगमध्ये गॅलतासरायकडून ०-१ असा पराभवाचा धक्का बसला.**



रेयाल माद्रिद, बायर्न म्युनिक आणि चेल्सी या संघांनी अपेक्षित विजय नोंदवले. गॅलतासरायविरुद्ध लिव्हरपूलने चेंडूवर अधिक वेळ ताबा राखला. मात्र, त्यांना गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. त्यातच बचावात त्यांच्याकडून काही चुका घडल्या. मध्यरक्षकांचा खेळही निराशाजनक ठरला. गॅलतासरायला १६व्या मिनिटाला पेनल्टी मिळाली. यावर तारांकित आघाडीपटू व्हिक्टर ओसिमेनने गोल नोंदवला. त्यानंतर उत्तरार्धाच्या सुरुवातीला दुसरीकडे, किलियन एम्बापेच्या हॅटट्रिकच्या जोरावर रेयाल माद्रिदने कझाकस्ताच्या एफसी कैरात संघाचा ५-० असा सहज पराभव केला. कैरात संघाचा चॅम्पियन्स लीगमधील हा पहिला सामना होता. जर्मनीतील बलाढ्य बायर्न म्युनिक संघाने सायप्रसच्या पाफोस संघावर ५-१ अशी मात केली. आघाडीपटू हॅरी केनने दोन, तर राफाएल गेरेरो, निकोलस जॅक्सन आणि मायकल ओलिसे यांनी एकेक गोल नोंदवला. चेल्सीने बेन्फिकावर १-० असा निसटता विजय मिळवला. ॲटलेटिको माद्रिद, इंटर मिलान आणि आयेक्स संघांनीही आपापले सामने जिंकले. गॅलतासरायने गोलच्या दोन संधी वाया घालवल्या. मात्र, त्यांनी बचाव भक्कम राखताना सामना १-० असा जिंकला.

### १६व्या मिनिटाला पेनल्टी मिळाली

रेयाल माद्रिद, बायर्न म्युनिक आणि चेल्सी या संघांनी अपेक्षित विजय नोंदवले. गॅलतासरायविरुद्ध लिव्हरपूलने चेंडूवर अधिक वेळ ताबा राखला. मात्र, त्यांना गोलच्या फारशा संधी निर्माण करता आल्या नाहीत. त्यातच बचावात त्यांच्याकडून काही चुका घडल्या. मध्यरक्षकांचा खेळही निराशाजनक ठरला. गॅलतासरायला १६व्या मिनिटाला पेनल्टी मिळाली.

स्मार्ट PCMC SMART CITY

# महाईन्यूज™

ePaper

epaper.mahaenews.com

। गुरुवार।
। दि. 2 ऑक्टोबर 2025।

पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

### तंत्रज्ञान विकासामुळे समाजोन्नती व लोककल्याणाला चालना

# भोंडल्याचा उत्साह, विद्यार्थ्यांनी धरला ठेका!

## शिक्षण विश्व: प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयात भोंडला आणि दांडियाचे आयोजन

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**प्रतिभा ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट अंतर्गत कार्यरत असलेल्या प्रतिभा शिक्षण शास्त्र महाविद्यालयाच्या बीएड विभागात पारंपरिक उत्सवाचे औचित्य साधून भोंडला आणि दांडियाचा रंगतदार कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला असून प्राध्यापक, विद्यार्थी आणि विद्यार्थिनींनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला.**



कार्यक्रमाची सुरुवात महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. पौर्णिमा कदम यांच्या हस्ते गजलक्ष्मी प्रतिमेची पूजा करून करण्यात आली. त्यानंतर पारंपरिक भोंडल्याची गाणी गात विद्यार्थ्यांनी आनंदाने फेर धरला. सांस्कृतिक वातावरणात भर घालत संगीताच्या तालावर साऱ्यांनी रंगतदार दांडिया खेळाचा आनंद लुटला. कार्यक्रमाच्या शेवटी सर्व सहभागी विद्यार्थ्यांना खिरापत वाटण्यात आली.

या प्रसंगी डॉ. पौर्णिमा कदम यांनी उपस्थितांना विजयादशमीच्या शुभेच्छा दिल्या. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्था सचिव डॉ. दीपक शहा, खजिनदार डॉ. भूपाली शहा आणि संचालिका डॉ. तेजल शहा यांचे मोलाचे मार्गदर्शन आणि सहकार्य लाभल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रा. पल्लवी चव्हाण यांनी केले. प्रा. गीता कांबळे यांनी उत्कृष्ट सूत्रसंचालन केले तर डॉ. सुवर्णा गायकवाड यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.V

### गुणवत्ता सुधारणा उपक्रम सादर करणाऱ्या ११८ कंपन्या

## उद्योग विश्व: पुणे कॉलिटी सर्कल फोरमचे 40वे अधिवेशन उत्साहात संपन्न

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड |प्रतिनिधी : कॉलिटी सर्कल फोरम ऑफ इंडिया पुणे चॅप्टरच्या ४० व्या वार्षिक गुणवत्ता संकल्पना अधिवेशनाचे दोन दिवसीय आयोजन भोसरी येथील क्वालिटी सर्कल एक्सलन्स सभागृहात मोठ्या उत्साहात पार पडले. या अधिवेशनात एकूण ११८ औद्योगिक संस्थांमधील १९०८ सहभागी सदस्यांनी सहभाग नोंदवून गुणवत्ता सुधारणा उपक्रमांचे सादरीकरण केले.**



कार्यक्रमात एकूण ४०५ केस स्टडीज, ४९ घोषवाक्ये आणि ६२ पोस्टर्स सादर करण्यात आले. यात टाटा, किर्लोस्कर, मिंडा, लुमॅक्स, सांदार, सुप्रीम समूह, गॅबराइल इंडिया, आर एस बी ट्रान्समिशन, टाटा ऑटोकॉम तसेच राजारामबापू कॉलेज ऑफ इंजिनिअरिंग इस्लामपूर यांसारख्या नामवंत संस्थांचा समावेश होता. अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी कार्यक्रमाचे उद्घाटन टीकेआयएल कंपनीतील रणनीती व परिवर्तन बॅटरी उद्योग विभागाचे प्रमुख सचिन जैन, भारत सरकारच्या एम एस एम ई मंत्रालयातील क्लस्टर डेव्हलपमेंट ऑफिसर अभय दापतदार यांच्या हस्ते करण्यात आले. दुसऱ्या दिवशी समारोपप्रसंगी रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेडचे वरिष्ठ उपाध्यक्ष व साइट अध्यक्ष पंकज यादव, सेल भिलाई स्टील प्लांटचे महाव्यवस्थापक महेश दुबे, राष्ट्रीय अध्यक्ष सतीश काळोखे, राष्ट्रीय संचालिका डॉ रजनी इंदुलकर यांच्यासह विविध पदाधिकारी उपस्थित होते.

हे अधिवेशन सहभागी व्यवस्थापनाच्या तत्त्वज्ञानावर आधारित असून कर्मचाऱ्यांच्या समस्या निवारण उपक्रम आणि सतत सुधारणा प्रयत्नांना प्रोत्साहन देते. विविध औद्योगिक विभागांतील कर्मचाऱ्यांनी केस स्टडीजद्वारे त्यांच्या कार्यस्थळी आलेल्या समस्यांचे विश्लेषण करून अंमलात आणलेल्या प्रभावी उपाययोजना सादर केल्या. उत्पादन, सेवा, शिक्षण आणि सार्वजनिक क्षेत्रातील क्वालिटी सर्कल टीम्सनी पॉवरपॉईंट सादरीकरणाद्वारे त्यांच्या सर्वोत्तम कार्यपद्धती सामायिक केल्या. कार्यक्रमात उत्कृष्ट गुणवत्ता उपक्रम सादर करणाऱ्या टीम्सना सुवर्ण, रजत आणि कास्य पदके तसेच प्रशस्तीपत्रके देऊन गौरवण्यात आले. सुमारे ५१ परीक्षकांनी विविध सादरीकरणांचे बारकाईने परीक्षण केले.

## ‘सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे’ आयोजन

# सफाई सेवकांच्या आरोग्याची काळजी घ्या–अतिरिक्त आयुक्त खोराटे

## दोन हजारांहून अधिक सफाई सेवकांची आरोग्य तपासणी

। पिंपरी चिंचवड ।
प्रतिनिधी : महाईन्यूज

**पिंपरी चिंचवड शहर सुंदर व स्वच्छ ठेवण्यात सफाई सेवकांचा मोलाचा वाटा आहे. ते शहराच्या स्वच्छतेचे खरे शिल्पकार असून त्यांच्या आरोग्य व सुरक्षेची काळजी घेण्यासाठी पिंपरी चिंचवड महापालिका प्राधान्य देत असते. याच हेतूने आज ‘सफाई मित्र सुरक्षा शिबिराचे’ आयोजन करण्यात आले आहे, असे प्रतिपादन महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी केले.**



राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंतीनिमित्त ‘स्वच्छता ही सेवा – २०२५’ पंधरवड्यांतर्गत महापालिकेकडून आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह, अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांच्या मार्गदर्शनाखाली व उपायुक्त सचिन पवार यांच्या अधिपत्याखाली स्वच्छता सेवकांच्या आरोग्य व सुरक्षेसाठी विविध उपक्रम राबवले जात आहेत. त्याचाच एक भाग म्हणून थेरगाव येथील स्व. शंकरराव गावडे कामगार भवन येथे ‘सफाई मित्र सुरक्षा शिबिर’ मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबिराचे उद्‌घाटन अतिरिक्त आयुक्त खोराटे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.

अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे पुढे म्हणाले, सफाई मित्रांच्या कल्याणासाठी महापालिका प्रशासन कटिबद्ध आहे. त्यांच्यासाठी महापालिकेच्या वतीने विविध योजना राबवल्या जात आहेत. या योजनांचा लाभ सफाई सेवकांना मिळावा, यासाठी सातत्याने महापालिकेकडून वेगवेगळे उपक्रम राबवले जात असतात. याशिवाय सफाई सेवकांची नियमित वैद्यकीय तपासणी करणे, त्यांना प्रशिक्षण देणे, त्यांना कामाच्या ठिकाणी सुरक्षिततेसाठी आवश्यक साधने उपलब्ध करून देणे, यावर देखील भर दिला जात आहे, असेही त्यांनी सांगितले. याप्रसंगी महापालिकेचे आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे, उपायुक्त सचिन पवार, क्षेत्रीय अधिकारी किशोर ननवरे, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, थेरगाव रुग्णालयाचे डॉ. राजेंद्र फिरके, डॉ. लक्ष्मीकांत अत्रे, डॉ. संजय सोनेकर, डॉ. शंकर मोसलगी यांच्यासह महापालिकेचे सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे, शांताराम माने, राजू साबळे, कुंडलिक दरवडे, महेश आढाव आदी उपस्थित होते.

शिबिरामध्ये नवीन थेरगाव, तालेरा, आकुर्डी, सांगवी, जिजामाता, यमुनानगर, भोसरी व वायसीएम रुग्णालयातील तज्ज्ञ डॉक्टरांनी सफाई सेवकांची तपासणी केली. यामध्ये रक्त तपासणी, ॲनिमिया, हिमोग्लोबिन, हृदयविकार, मधुमेह, कॅल्शियम, हायपरटेन्शन आदींची तपासणी करून मोफत औषध वितरण करण्यात आले. शिबिरात तब्बल २ हजारांहून अधिक सफाई सेवकांची मोफत आरोग्य तपासणी करण्यात आली.

यावेळी आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ. लक्ष्मण गोफणे यांनी सफाई सेवकांना नियमित आरोग्य तपासणी करण्याचे आवाहन केले. तसेच महापालिकेच्या रुग्णालयांमध्ये मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध असल्याची माहिती दिली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उपायुक्त सचिन पवार यांनी करताना सांगितले की, सफाई सेवक हा शहराचा कणा आहे. त्यांचे आरोग्य सक्षम ठेवणे ही महापालिकेची जबाबदारी आहे, असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले तर सहाय्यक आरोग्य अधिकारी सुधीर वाघमारे यांनी आभार मानले.

### विविध योजनांची माहिती

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या समाज विकास विभागाच्या वतीने सफाई सेवकांना विविध योजनांचा लाभ व्हावा तसेच त्यांना याची सविस्तर माहिती व मार्गदर्शन मिळावे, या उद्देशाने माहितीपर स्टॉल देखील यावेळी लावण्यात आला होता. त्यामध्ये महिला व बालकल्याण कल्याणकारी योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, दिव्यांग कल्याणकारी योजना इत्यादी योजनांचा समावेश होता.

## भुजबळ चौक ते भूमकर चौकातील कामे ‘फास्ट ट्रॅक’वर

### उद्योग विश्व: आमदार जगताप यांचा पाठपुरावा; वाहतूक कोंडी पासून नागरिकांना दिलासा

। पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी : महाईन्यूज

**भूमकर चौक ते भुजबळ चौक परिसरातील नागरिकांना वाहतूक कोंडीतून  दिलासा मिळाला आहे. रस्त्याची कामे अतिक्रमणे रस्त्यावरील खड्डे बुजवणे सर्विस लाईन शिफ्ट करणे इत्यादी कामांमुळे वाहतूक सुरळीत होण्यास हातभार लागला आहे  या परिसरातील कामे फास्ट ट्रॅकवर घेण्यात येत आहे. त्यामुळे लवकरच नागरिकांना वाहतूक कोंडीच्या त्रासातून पूर्ण दिलासा मिळणार आहे.**




गेल्या वर्षभरापासून वाकड-भूमकर चौक परिसरात वाढत्या वाहतूक कोंडीचा प्रश्न गंभीर बनला होता. या संदर्भात आमदार शंकर जगताप यांनी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, पिंपरी-चिंचवड महापालिका, महावितरण, वाहतूक पोलीस, आरटीओ ,यांसह विविध शासकीय यंत्रणांशी सतत समन्वय साधून उपाययोजना राबवल्या.

या पाठपुराव्याला आता ठोस परिणाम दिसू लागले आहेत. वीज कंपनीचे डीपी व ट्रान्सफॉर्मर शिफ्ट करणे, रस्त्यांची आखणी, खड्डे बुजविणे, अतिक्रमण हटविणे आणि राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या ताब्यातील सर्व्हिस रोडवर प्रत्यक्ष काम सुरू करणे अशा अनेक महत्त्वाच्या टप्प्यांची अंमलबजावणी झाली आहे.,आजच्या स्थळ पाहणीत आमदार जगताप यांनी रस्त्यावरील झाडांची छाटणी व पुनर्रोपण, शोरूमसमोरील जागा ताब्यात घेणे, अतिक्रमण हटवणे, शिवनेरी एसटी बसस्टॉप शिफ्ट करणे, पीएमपीएमएलचे थांबे मागील बाजूस योग्य ठिकाणी हलवणे, नवीन सर्विस रस्त्याच्या कामात मध्ये टीप टॉप इंटरनॅशनल हॉटेल जवळील कंटेनर हटवणे, एमएसईबीच्या सर्विस लाईन शिफ्ट करणे, ड्रेनेज लाईन स्थलांतरित करून जोडणे , वाहन चालकांकरता नवीन कॅरेज वे तयार करणे,यासारख्या तातडीच्या सूचनादेखील दिल्या.

College of Pharmacy
Saswad, Pune - 412301
D.Pharm/B.Pharm/M.Pharm/Ph.D.

PDEA

Pharmacy Council of India
SPPU Affiliation
NAAC Accreditation
Maharashtra State Board of Technical Education

## Facilitation & Verification Center for F. Y. B.Pharm, F.Y.M.Pharm,and Direct S.Y.B.Pharm Admission 2025–26



### Admission Schedule for F.Y.B.Pharm

| | |
|---|---|
| Online Registration & Document Upload | 07 – 21July 2025 (10:00AM-5:00PM) |
| Document Verification & Form Confirmation (Physical Scrutiny at FC) | 08 – 22 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Display of Provisional Merit List | 25 July 2025 |
| Grievance Submission (Online / at FC) | 26– 28 July 2025 (10:00AM-5:00 PM) |
| Final Merit List | 31 July 2025 |

Your Trusted Facilitation Centre!

FC Code 6372

Important Note:

- Bring all original + Xerox copies of documents
- Late registrations after 14 July are for Non-CAP seats only

"Your First Step Towards a Bright Pharmacy Career!"

Confirm Your



Visit Us for Physical Scrutiny

PDEA's Seth Govind Raghunath Sable College of Pharmacy, Saswad


Express
Media Enterprises
Professional Live set up with live drone available..
Documentary
Weddings
Drone
Motion Graphics
Testimonials
Tutorial videos
Product Videos
Animation
Social Media Content
Promotional Videos
Real Estate
Corporate
Advertising
Events
PUNE
Contact: 9657767000/9370493922/9664188046